महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
नवी मुंबई

# पोलीस आयुक्त कार्यालय, नवी मुंबई

भारतीय रिझर्व्ह बँकेसमोर, से. १०, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई
☎- ०२२-२७५६११२९ email- estbablishmentbr-nm@mahapolice.gov.in

जा.क्र.पोआ/नमुं/आस्था-१/विधी अधिकारी/३५३६ /२०२४ नवी मुंबई, दिनांक २५.०९.२०२४

प्रति,

सहायक संचालक (जाहिरात)
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
जाहिरात शाखा, तळमजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मुंबई ४०००३२

विषयः- विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी भरती - २०२४ संबधीची जाहिरात वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द करणेबाबत.

---ooo---

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी यांची भरती प्रस्तावित आहे. पात्र उमेदवारांचे अर्ज दिनांक २५.१०.२०२४ रोजीपर्यत मागविण्यात आलेले आहेत. त्यासंबंधीची जाहीरात वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यासाठी जाहिरातीचा नमुना तयार करून ४ प्रतीमध्ये यासोबत जोडला आहे.

तरी, कृपया सदरची जाहीरात दिनांक २५ /०९/२०२४ रोजीचे नवी मुंबई, ठाणे व मुंबई साठी प्रसिध्द होणाऱ्या दैनिक लोकमत, दैनिक सकाळ व दैनिक महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात यावी ही विनंती.

(मिलिंद भारंबे)
पोलीस आयुक्त नवी मुंबई

प्रत सविनय सादरः-
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :- सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश विभाग, नवी मुंबई
२/- सोबत जोडलेली जाहिरात तात्काळ नवी मुंबई पोलीस दलाचे www.navimumbaipolice.gov.in या संकतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

प्रत :- प्रमुख लिपीक, नोंदणी शाखा
२/- विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी पदासाठी येणारे अर्ज दिनांक २५.१०.२०२४ रोजी १७.०० वा. पर्यंत स्विकारण्यात यावेत. तसेच अर्जासोबत पत्रव्यवहाराकरीता उमेदवाराचा पत्ता असलेले एक लिफाफा (पोस्टाचे तिकीट लावलेले) जोडलेले असल्याची खात्री करूनच अर्ज स्विकारण्यात यावेत.

प्रत :- पोलीस नोटीस प्रसिध्दीकरीता.

Mahabharti.in

## संकेत स्थळावर दयावयाची माहिती

पोलीस आयुक्त, नवी मुंबई आस्थापनेवरील "**विधी अधिकारी - गट ब**" व "**विधी अधिकारी**" यांची रिक्त पदे पुर्णतः कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत.

---

जाहिरात क्रमांक. पोआ/नमुं/आस्था-१/वि.अ.भरती/3436/२०२४ नवी मुंबई दिनांक २५/०९/२०२४

---

पोलीस आयुक्त, नवी मुंबई कार्यालयाचे आस्थापनेवर "**विधी अधिकारी गट -ब**" व "**विधी अधिकारी**" यांची रिक्त पदे भरावयाची आहेत.

खालील नमूद "विधी अधिकारी गट-ब" व "विधी अधिकारी" यांची रिक्त पदे भरण्यासाठी नमूद अटी व पात्रता पुर्ण असलेल्या उमेदवारांकडून ११ महिन्यांकरीता पुर्णतः कंत्राटी पध्दतीने नियुक्तीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. खालील दर्शविलेल्या पदांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

| अ. क्र. | पदनाम | रिक्त पदांची संख्या | मानधन |
|---|---|---|---|
| १ | विधी अधिकारी गट - ब | ०२ | एकत्रीत अनुज्ञेय मासीक देय रक्कम रुपये २५,०००/- आणि दुरध्वनी व प्रवास खर्चाकरीता रुपये ३०००/- असे एकुण २८,०००/- दरमहा देय राहील. |
| २ | विधी अधिकारी | ०४ | एकत्रीत अनुज्ञेय मासीक देय रक्कम रुपये २०,०००/- आणि दुरध्वनी व प्रवास खर्चाकरीता रुपये ३०००/- असे एकुण २३,०००/- दरमहा देय राहील. |

**सूचनाः-**

१. "विधी अधिकारी - गट ब" व "विधी अधिकारी" या पदांसाठी करावयाचे अर्ज पोलीस आयुक्त, नवी मुंबई, रिझर्व्ह बँके समोर, सेक्टर १०, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई पिनकोड-४००६१४ यांचेकडे दि.२५.१०.२०२४ रोजी संध्याकाळी १७.०० वा. पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावीत.

२. उमेदवाराने सोबत दिलेल्या विहित नमून्यातील अर्ज परिपुर्ण भरून व त्यासोबत आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या प्रती जोडून लिफाफ्यात घालून उजव्या बाजूला ठळक अक्षरात "विधी अधिकारी - गट ब" व "विधी अधिकारी" असे नमूद करून अर्ज दिनांक २५.१०.२०२४ रोजी संध्याकाळी १७.०० वा. पर्यंत पोलीस आयुक्त, नवी मुंबई या पत्यावर पोहचतील याची दक्षता घ्यावी.

३. दि. २५.१०.२०२४ रोजी १७.०० वा. नंतर या कार्यालयात प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

४. अर्जासोबत पत्रव्यवहाराकरीता उमेदवाराचा पत्ता असलेला एक लिफाफा जोडावा. (पोस्टाचे तिकीट लावलेला)

५. अर्जाचा नमूना https://www.navimumbaipolice.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आलेला आहे. सदर अर्जाचा नमुना डाउनलोड करून अर्ज परिपुर्णरित्या भरावा.

६. पोलीस आयुक्त, नवी मुंबई कार्यालयात वरील मुदतीत हस्ते देखील अर्ज स्विकारले जातील.

**करारातील मासिक देय रक्कम**

अ) विधी अधिकारी गट-ब या पदाकरीता एकत्रीत अनुज्ञेय मासीक देय रक्कम रुपये २५,०००/- आणि दुरध्वनी व प्रवास खर्चाकरीता रुपये ३०००/- असे एकुण २८,०००/- दरमहा देय राहील.( उपरनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा ) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

ब) विधी अधिकारी या पदाकरीता एकत्रीत अनुज्ञेय मासीक देय रक्कम रुपये २०,०००/- आणि दुरध्वनी व प्रवास खर्चाकरीता रुपये ३०००/- असे एकुण २३,०००/- दरमहा देय राहील.( उपरनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा ) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

...२/-

Mahabharti.in

''विधी अधिकारी - गट ब'' व '' विधी अधिकारी'' या पदासाठी शैक्षणिक अर्हता व अनुभव

➢ शैक्षणिक अर्हता व अनुभव

१. उमेदवार मान्यताप्राप्त विदयापिठाचा कायदयाचा पदवीधर असेल व तो सनदधारक असेल.

२. ''विधी अधिकारी - गट ब'' व '' विधी अधिकारी''या दोन्ही पदांसाठी वकील व्यवसायाचा किमान ०५ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.

३. उमेदवार गुन्हेगारी विषय, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायदयाची स्थिती तथा विभागीय चौकशी इत्यादी बाबतीत ज्ञान संपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडु शकेल.

४. उमेदवारांस मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे पुरेस ज्ञान असणे आवश्यक आहे.

➢ उमेदवाराचे वय

१. ''विधी अधिकारी - गट ब'' व '' विधी अधिकारी'' या पदाकरीता उमेदवाराचे वय नियुक्तीचे वेळी ६० वर्षापेक्षा जास्त नसावे.

२. जी व्यक्ती शासकीय सेवेत असताना प्रत्यक्षपणे विधी विषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी, प्रशासकीय व सेवाविषयक कायदयाविषयक सखोल ज्ञान असेल त्याचप्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायदयाचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागु राहतील. **शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.**

➢ **''विधी अधिकारी - गट ब'' व '' विधी अधिकारी'' यांच्या कर्तव्य व जबाबदा-या**

१) कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत/ न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

२) सेवाविषयक/प्रशासकीय बाबी/विभागीय चौकशी तथा समकालीन कायदयाची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

३) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकिलांकडे पाठपुरावा करणे जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्रे संबधीत अधिका-याच्या मदतीने तयार करणे.

४) शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेवुन न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल हे पाहणे.

५) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे. अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून तद्नुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

६) अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करून तो संबधीत सरकारी वकिलांकडे पाठविणे व अपीलाचा अंतिम निर्णय लागेपर्यत पाठपुरावा करणे.

७) विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमुन दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.

८) पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.

**अटी व शर्तीः-**

१. '' विधी अधिकारी गट ब'' व '' विधी अधिकारी'' या संवर्गातील पदे मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष हक्क याचिका क्र.(सिव्हिल) १९००८-१९००९/२०१२, ३४७८८-३४७८९/२०१२ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १२/०७/२०१६ रोजी दिलेल्या अंतिम निर्णयानुसार भरण्यात येतील.

२. '' विधी अधिकारी गट ब'' व '' विधी अधिकारी''या पदांची नेमणूक ही पुर्णतः कंत्राटी पध्दतीने असेल. उमेदवाराला शासकीय अधिकारी /कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.



Mahabharti.in

३. सदर नेमणुका हया करार पध्दतीने ११ महिन्यांसाठी करण्यात येतील. ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी (जास्तीत जास्त ३ वेळा ११ महिन्यांकरिता) वाढविता येईल. ३ वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही अशा उमेदवाराची पुन:श्च नियुक्ती करणे आवश्यक आहे असे सक्षम प्राधीका-याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुन:श्च निवड प्रक्रियेला समोरे जावे लागेल.

४. निवड केलेले उमेदवार ११ महिन्याच्या कराराच्या कालावधीत वकीली व्यवसायांशी संबधीत कोणत्याही प्रकारचे खाजगी काम / व्यवसाय नियुक्ती प्राधिका-याच्या लेखी परवानगी शिवाय करु शकणार नाही. जर नियुक्ती प्राधीका-याने सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरु ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

५. '' विधी अधिकारी गट ब'' व '' विधी अधिकारी''या पदासाठी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची निवड लेखी परिक्षा व मुलाखतीद्वारे करण्यांत येईल.

अ) लेखी परिक्षा ५० गुणांची व तोंडी परिक्षा २५ गुणांची घेण्यांत येईल.

ब) लेखी परिक्षेत व तोंडी परिक्षेत प्राप्त गुण एकत्रित करुन एकूण गुणानुक्रमानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची रिक्त पदात कंत्राटी पध्दतीने नेमणूकी संबंधी कार्यवाही करण्यांत येईल.

क) कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देणेसाठी कमीत कमी ६०% गुण असणे आवश्यक राहील.

६. लेखी परिक्षा व मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना नंतर पत्राद्वारे व संकेतस्थळाद्वारे व एसएमएसद्वारे कळविण्यात येईल.

७. उमेदवाराला कोणताही प्रवास खर्च देण्यात येणार नाही.

८. नियुक्त केलेल्या उमेदवारास या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा ( Agreement ) भरणे अनिवार्य राहील.

९. करार पध्दतीने नेमणुक करण्यात येणा-या '' विधी अधिकारी गट ब'' व '' विधी अधिकारी'' यांना एकत्रीत वेतन आणि अनुज्ञेय व दुरध्वनी व प्रवास खर्चाकरीता ( उपरनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा ) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

१०. उमेदवाराने वर विहीत केलेल्या शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी दिनांक २५/०९/२०२४ रोजीपर्यंत पुर्ण करणे आवश्यक आहे.

११.अर्जासोबत २.५ + २.५ सेमी आकाराचे सध्याचे काढलेले ४ रंगीत फोटो जोडावेत. तसेच पत्रव्यवहाराकरीता उमेदवाराचा पत्ता असलेला एक लिफाफा जोडावा. (पोष्टाचे तिकीटासह)

१२. उमेदवाराची पात्रता, भरती प्रक्रिया इ. विषयी निर्णय घेण्याचा सर्व अधिकार हा निवड मंडळास राहील व तो सर्व उमेदवारास बंधनकारक राहील.

वरील रिक्त पदे ही शासनाने वेळोवेळी आदेशित केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून कंत्राटी पध्दतीने भरण्याचे आदेशित झालेले आहे. निवड प्रक्रियेबाबतची कार्यवाही करणेचे तसेच निवड झालेल्या उमेदवारांची निवड कोणत्याही कारणास्तव व कोणत्याही टप्प्यावर केव्हाही रद्द करण्याचे तसेच परीक्षेसंबंधीचे नियमात बदल करण्याचा अधिकार सर्वस्वी नियुक्ती प्राधिकाऱ्यास राहतील.

( मिलिंद भारंबे )
पोलीस आयुक्त, नवी मुंबई

Mahabharti.in

# पोलीस आयुक्त कार्यालय नवी मुंबई
## ''विधी अधिकारी गट- ब'' व ''विधी अधिकारी '' पदाचे अर्जाचा नमुना

''विधी अधिकारी - गट ब'' व ''विधी अधिकारी '' पदाकरिता अर्ज

नियुक्तीचे इच्छुक ठिकाण :- ------------------------------------------

| |
|---|
| कार्यालयीन उपयोगासाठी |
| १) अर्ज क्रमांक :- |
| २)अर्ज स्विकारल्याचा दिनांक :- |
| ३) अर्ज स्विकारणा-याची स्वाक्षरी ( दिनांकासह ):- |

एक फोटोवर स्वाक्षरी करून या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करून अर्जासोबत लिफाफ्यात जोडावा.

सुचना : अर्जदाराने अर्जातील अंक इंग्रजीत लिहावेत.
अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजीत लिहावी.
आवश्यक नसेल तेथे खोडावे.

### अ ) <u>अर्जदाराची वैयक्तीक माहिती</u>

१) अर्जदाराचे पुर्ण नाव : आडनाव नाव वडिलांचे/पतीचे नाव
मराठीत :-........................................................................................

इंग्रजीत | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

२) पत्रव्यवहाराचा पत्ता : ........................................................................

तालुका .....................जिल्हा......................पिनकोड.............

३)कायमचा पत्ता : ..........................................................................

तालुका .....................जिल्हा......................पिनकोड.............

४) दुरध्वनी क्रमांक : लॅन्डलाईन ----------------- मोबाईल क्र. ------------------------

ईमेल :- ------------------------------------------------------

५)जन्मदिनांक

| | | | | | | | | जन्मस्थळ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| दिवस | | महिना | | वर्ष | | | | | |

६) दिनांक २५/०९ /२०२४ रोजीचे वय :

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| दिवस | | महिना | | वर्ष | | | |

७) लिंग : पुरुष / महिला

८) धर्म : ..........................जातः..............................................

९) महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी आहात का ? : होय / नाही

१०) शैक्षणिक अर्हता :

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नाव (विदयालय/ महाविदयालय) | बोर्ड/ विदयापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. माध्यामिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा ( इ. १० वी ) अथवा जुनी ११ वी परिक्षा | | | | | |
| २. उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा ( इ. १२ वी.) | | | | | |
| ३. पदवी | | | | | |
| ४. विधी पदवी | | | | | |

११) इतर शैक्षणिक अर्हता :

संगणक प्रशिक्षीत आहे काय ? होय /नाही.

१२) अर्जदाराची इतर माहिती.

अ) सनद घेतल्याचा दिनांक.:- -------------

ब ) उमेदवाराने स्वतः हाताळलेल्या केसेसचा तपशील.

| अ.क्र. | न्यायालयाचे नावे | केसेसचा प्रकार | केसेसच्या संख्या |
|---|---|---|---|
| | | | |

टिप :- वकिली व्यवसायाचे अनुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| १३- अ) | अर्जदारावर यापुर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात /स्थानबध्द करण्यात /दंड करण्यात /सिध्ददोषी ठरवण्यात आले आहे काय ?,किंवा लोकसेवा आयोगाकडुन त्यांच्या परिक्षांना /निवडीना बसण्यास मनाई करण्यात आले आहे काय ?, किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय ?, किंवा कोणत्याही विदयापीठाकडुन किवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडुन /संस्थेकडुन कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय ? काढुन टाकण्यात आले आहे काय ? | होय / नाही |
| १३- ब) | हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विदयापिठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात/संस्थेत उमेदवाराविरूध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय ? | होय / नाही |

( १३ -अ किवा १३-ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरताना सदर खटला, अटक, स्थानबध्दती, दंड, दोषसिध्दी, शिक्षादेश इत्यादीचा संपुर्ण तपशील आणि न्यायालय/विदयापीठ/शैक्षणिक प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरूप स्पष्ट करावे.)

१३ - क :- सदर अर्जात भरलेला सर्व मजकुर खरा आहे व अर्जदारास मान्य आहे. सदरबाबत कोणतीही माहिती चुकीची अथवा खोटी आढळल्यास त्याबाबत उचित कार्यवाही करण्यास माझी हरकत राहणार नाही.

१३ - ड :- निवड प्रक्रियेबाबतची कार्यवाही करणेचे तसेच निवड झालेल्या उमेदवारांची निवड कोणत्याही कारणास्तव व कोणत्याही टप्प्यावर केव्हाही रद्द करण्याची तसेच परिक्षेसंबधीचे नियमात बदल करण्याचे अधिकार सर्वस्वी नियुक्ती प्राधीका-यास राहील. वरील सर्व अटी व शर्ती मला मान्य असून त्या अटी व शर्तीच्या अधीन राहूनच मी सदरचा अर्ज करीत आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची सही.

( दिनांकासह )